# उल्हासनगर महानगरपालिका

**वैद्यकिय आरोग्य विभाग**

**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान**

(कार्यालय दुरध्वनी क्र. 0251-2720116 विस्तारीत क्र. 208/241)

## -: जाहीरात :-

उल्हासनगर महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभाग अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रम (NUHM) अंतर्गत कंत्राटी तत्वावर रिक्त पदे भरण्यासाठी **औषध निर्माता (Pharmaist), स्टाफ नर्स (Staff Nurse), प्रयोगशाळा चाचणी तंत्रज्ञ. (Lab Technician) व सहाय्यक परिचारीका प्रसाविका** (ANM) या पदासाठी दिनांक २१/०४/२०२२ रोजीच्या जाहिरातीन्वये दि. २५/०४/२०२२ ते दि. २८/०४/२०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. त्याची छाननी सुरू असून मागविलेल्या अर्जधारकांपैकी पात्र उमेदवारांसाठी दिनांक १३/०५/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता पासून विविध पदासाठी अग्निशमन विभाग इमारत, पहिला मजला, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर-३ थेट मुलाखत (WALK INTERVIEW) आयोजित करण्यात आलेली आहे. मुलाखतीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

<u>**तक्ता " अ "**</u>

| अ.क्र. | पदनाम | दिनांक | मुलाखतीची वेळ |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक परिचारीका/प्रसाविका (ANM) | १३/०५/२०२२ | सकाळी १० : ०० ते दुपारी २ : ३० |
| २ | प्रयोगशाळा चाचणी तज्ञ (Lab Technician) | १३/०५/२०२२ | दुपारी ३ : ०० ते सायं. ४ : ०० |
| ३ | औषधनिर्माता(Pharmasist) | १३/०५/२०२२ | सायं ४ : ०० ते सायं. ४ : ३० |
| ४ | स्टाफ नर्स (GNM) | १३/०५/२०२२ | सायं ४ : ३० ते सायं. ५ : ३० |

टिप :- ज्या संवर्गाच्या मुलाखती साठी निश्चित केलेल्या वेळेपुर्वी संबंधित उमेदवारांनी किमान अर्धा तास अगोदर उपस्थित रहावे.

२. औषध निर्माता (Pharmaist), स्टाफ नर्स (Staff Nurse), प्रयोगशाळा चाचणी तंत्रज्ञ. (Lab Technician) व सहाय्यक परिचारीका प्रसाविका (ANM) या पदासाठीसाठीच्या प्राप्त अर्जाची छाननी करण्यात येवुन उपलब्ध पदाच्या १ : ५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी निमंत्रित करण्यात येत आहे.

३. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर १:५ या प्रमाणात अर्जदार यांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार प्राप्त गुणांची टक्केवारी विचारात घेऊन मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात येत आहे.

४. उच्चतम गुणधारक अशा मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी पदनिहाय महानगरपालिकेच्या <u>www.umc.gov.in</u> या संकेत स्थळावर व सुचना फलकावर दिनांक १२/५/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

५. सर्व अर्जदार यांना सुचित करण्यात येते की, संकेतस्थळावर प्रसिध्द होणारे पात्र मुलाखतीची यादी पहावी. व फक्त पात्र उमेदवारांच्याच मुलाखती वरील तक्ता " अ " प्रमाणे घेतल्या जातील. अपात्र उमेदवारांना मुलाखतीस उपस्थित राहता येणार नाही. अपात्र उमेदवार उपस्थित राहील्यास त्यास प्रशासनाची जबाबदारी राहणार नाही.

६. मुलाखतीस पात्र उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय राहणार नाही व कोणतेही भोजन, चहापान व्यवस्था राहणार नाही. तसेच त्यांनी स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित राहावे.

७. मुलाखतीच्या वेळी कोणत्याही प्रकारचे निवड होण्यासाठी दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/ २५५ /२०२२

**दिनांक :-** ०९/०५/२०२२

**उप आयुक्त (मुख्यालय)**

**उल्हासनगर महानगरपालिका**